# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ दिनांक :
Ref. No. : PAHSU/BOEE/ Date :

परिपत्रक - 11

# मार्च/एप्रिल/मे-२०२० उन्हाळी सत्रातील परीक्षांबाबत

**संदर्भ** : मा. संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.यूएनआययूएएनआय/२०२०बैठक/विशि-१/५६४०-A दिनांक ०३/०९/२०२०

कोव्हिड -१९ या जागतीक महामारीच्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे प्रस्तुत विद्यापीठातील माहे मार्च/एप्रिल २०२० च्या सर्व परीक्षा घेण्यात आलेल्या नाहीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अदेशान्वये मा. राज्यपाल तथा कुलपती, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व सर्व कुलगुरू यांचेशी आभासी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिकार मंडळामध्ये उक्त परीक्षांचे आयोजन करण्यासंदर्भात घेतलेल्या बैठकातील निर्णयानुसार खालीलप्रमाणे परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

१. **प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व लेखी परीक्षा या Online/Offline पध्दतीने घेण्यात येणार असून, सदरची अंतिम वर्षातील अंतिम सत्राची लेखी परीक्षा ही ५० प्रश्नांची बहुपर्यायी असून प्रत्येक प्रश्नास १ गुण याप्रमाणे ५० गुणांची परीक्षा असणार आहे. व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ही ३५ प्रश्नांची बहुपर्यायी असून त्यांचे गुण ५० मार्कामध्ये रुपांतरीत होणार आहे. या परीक्षेमध्ये निगेटीव्ह मार्कींग राहणार नाही.**

२. **सदरची परीक्षा ही नविन तंत्रज्ञानाचा वापर करून Online Proctored Method नी घेतली जाणार आहे.**

३. **प्रत्येक परीक्षा पेपरचा कालावधी हा 1½ तासाचा आहे. काही तांत्रिक आडचणी मुळे Conectivity उपलब्ध झाली नाही तर त्यावेळी विद्यार्थ्यांनी Conectivity मिळाल्यानंतर उरलेले प्रश्न वेळेप्रमाणे पूर्ण करावेत. यासाठी सदरची प्रश्नपत्रिका या वेळापत्रकाप्रमाणे ५ तास उपलब्ध असतील.**

४. **सदरच्या परीक्षा रविवारी व सार्वजनीक सुट्टीच्या दिवशी ही घेण्यात येतील.**

५. **सर्व विद्यार्थ्यांनी Online / Offline परीक्षा देण्याबाबत संमतीपत्र दिनांक १५/०९/२०२० पर्यंत भरून देणे आवश्यक आहे. सदर फॉर्म कॉलेज बेबसाईटवर उपलब्ध आहे. यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी संमतीपत्र भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

६. **ज्या विद्यार्थ्यांनी संमतीपत्रामध्ये Online पध्दतीस पसंती दिली आहे ते विद्यार्थी घरी राहून त्यांच्या स्वताच्या Android Mobile, Laptop, Computer इत्यादी साधनाद्वारे Online पध्दतीने व ज्या विद्यार्थ्यांनी Offline पध्दतीस पसंती दिली आहे ते विद्यार्थी OMR Sheet द्वारे घरी राहून अथवा नियुक्त ठिकाणी Offline पध्दतीने वेळापत्रकाप्रमाणे निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसारच परीक्षा देवू शकतील.**

७. **Online पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना Mock Test व इतर तांत्रिक माहिती परीक्षेपूर्वी देण्यात येईल.**

८. **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्षिक परीक्षा या दिनांक ४ सप्टेंबर, २०२० ते १३ सप्टेंबर, २०२० पर्यंत घेवून त्याचे गुण विद्यापीठाकडे जमा करण्याबाबत यापूर्वी कळविले असून ते विहित मुदतीत जमा करावेत.**

९. **परीक्षेचे Draft वेळापत्रक दिनांक ११/०९/२०२० पर्यंत जाहिर करण्यात येणार आहे.**

१०. **अंतिम वर्षामध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्राची लेखी परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० ते २० ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहे.**

**अ)** दोन वर्षीय अभ्यासक्रमाध्ये चौथ्या सत्राचे विद्यार्थी व चौथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र १, २ व ३ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहेत.

**ब)** तीन वर्षीय अभ्यासक्रमामध्ये सहाव्या सत्राचे विद्यार्थी व सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ३, ४ व ५ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहेत.

**क)** चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांच्या BE-२ च्या ज्या विद्यार्थ्यांचे TE-१, TE-२ व BE-१ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा BE-२ च्या परीक्षेपूर्वी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहेत.

**ड)** तसेच, चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये फार्मासी या अभ्यासक्रमांला Cary forward असल्याने सत्र १, २, ३, ४, ५, ६ व ७ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा आठव्या सत्राच्या परीक्षेपूर्वी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहेत.

**ई)** पाच वर्षीय अभ्यासक्रमामध्ये दहाव्या सत्राचे विद्यार्थी व दहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ७, ८ व ९ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये होणार आहेत.

११. **अंतिम वर्ष व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यी वगळता सत्र २, ४, ६, ८ मध्ये प्रवेशित विद्यर्थीनी त्यांचे मागील सत्रातील सर्व अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा द्यायची आहे. त्यांचा मागील सत्रातील सत्रातील अनुत्तीर्ण विषयातील गुणांप्रमाणे ५० टक्के व अंतर्गत/ प्रात्यक्षिक परीक्षेचे ५० टक्के गुण देवून प्रवेशित सत्राचा निकाल जाहिर करण्यात येईल. त्यांना सत्र २, ४, ६ व ८ या सत्राची परीक्षा द्यावी लागणार नाही.**

१२. बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी., बी.बी.ए, बी.सी.ए., व एलएल. बी. या अभ्यासक्रमातील सत्र १ व २ / बी.ए. एलएल.बी. या अभ्यासक्रमातील सत्र १ ते ६ / अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील FE-१, २ व SE-१, २ / आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या १ ते ६ च्या परीक्षा या नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यामध्ये सुरू करून १२ नोव्हेंबरपर्यंत घेण्याचे नियोजन आहे.

१३. ज्या विद्यार्थ्यांना एटीकेटी न मिळाल्याने Year Down झालेले व तसेच मागील परीक्षेत अनुपस्थित असतील अशा विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे.

१४. Offline पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या ठिकाणी परीक्षा देण्यासाठी जाताना तोंडाला मास्क लावणे व Social Distancing पाळणे बंधनकारक असेल तसेच कोव्हिड १९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपययोजनांचे व सुचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

कोव्हिड-१९ या जागतीक महामारीची परीस्थिती पाहता सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शक्यतो Online परीक्षा देण्याबाबत प्रोत्साहीत करावे.

(सीए श्रेणीक शाह)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा. क्र. पुअहोसोवि/परीक्षा/२०२०/707
दिनांक 10 SEP 2020